# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे  इतिवृत्तांत

दिनांक ०६-०१-२०१०

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## ०६/१/२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२१) इतिवृत्त

दि.०६/१/२०१० रोजी **मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ४.४५ वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०३. श्री. सुरे सिताराम इसराम
०४. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०५. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०६. श्री. जावेद हसन खान
०७. श्री. पांडे विनायक प्रभाकर
०८. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
०९. श्रीमती मेहरून्नीसा खान
१०. श्री.सोनवणे कचरू श्रीपत
११. सौ. मोमीन सफिया फिरदौस

**विषय क्र. २८९ :**

दिनांक ५/१२/२००९ (दि.४.१२.२००९ ची तहकुब सभा-का.प.क्र.१८) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक ५/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २९० :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, शासन निर्णय क्र.एनएपी-१००६/प्र.क्र.२७०/ल.५, दिनांक ५-२-२००९ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ३३०-अ अन्वये व महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २९ ऑक्टोबर २००९ रोजी प्रसिध्द झाल्यानुसार मा.जिल्हाधिकारी यांना प्राप्त असलेले अधिकारान्वये त्यांचे कार्यक्षेत्रात मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना अकृषी कर वसूल करणे बाबतचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

सदरचे शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३(२) मध्ये "महानगरपालिका क्षेत्रातील अकृषी कराच्या मागणीची रक्कम महानगरपालिकेकडून मिळकत कराच्या समवेत वसूल करण्यात यावी. महानगरपालिका क्षेत्रातील एकूण अकृषी कराच्या मागणीच्या ७५% इतकी रक्कम महानगरपालिकेस नगरविकास विभागाकडून देय असलेल्या अनुदानातुन शासन स्तरावरून वळती करून देण्यात यावी. उर्वरीत २५% रक्कमेपैकी २०% रक्कम महानगरपालिकेने कोषागारात जमा करावी. एकूण अकृषी कर आकारणीच्या मागणीपैकी ५% रक्कम वटावा (Collection Charges) म्हणुन संबंधित महानगरपालिका यांचेकडे ठेवुन घेण्यास मान्यता देण्यात आली. ही कार्यपध्दती केवळ अकृषी कर आकारणी पुरतीच लागू असून रूपांतरण कराची रक्कम मात्र संपूर्णतः शासकीय कोषागारात जमा करणे बंधनकारक राहील." असे नमूद आहे.

त्यानुसार महानगरपालिकेकडे एकूण अकृषी करापोटी वसूल होणाऱ्या रक्कमेपैकी ८०% रक्कम महानगरपालिकेकडे राहील व २०% रक्कम केवळ शासन कोषागारात जमा करण्यात येईल.

करीता वॉर्ड कार्यालय 'अ' ते 'फ' अंतर्गत मालमत्ता कर व पाणीपट्टी करासोबत अकृषी कराची रक्कम वसूल करणेसाठी सर्व वॉर्ड अधिकारी यांना मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६८ व ६९(१) अन्वये अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे. याबाबत मा.स्थायी समितीने मान्यता दिल्यास वॉर्ड अधिकारी 'अ' ते 'फ' यांना अकृषी कर वसूल करणेचे अधिकार प्रदान करून वसूली करता येईल.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.प्रशांत देसरडा : शासनामार्फत एन.ए.ची वसुली होत होती आता महानगरपालिका करणार आहे. ७५ टक्के रक्कम महानगरपालिकेला मिळतच होती आता वसुल रकेमेपैकी ५ टक्के रक्कम (Collection Charges) अधिकची मिळणार आहे. आज रोजी १० कोटी ३६ लाख रूपये एन.ए.च्या माध्यमातून येणे बाकी आहे. तत्कालिन आयुक्तांनी, मा.आयुक्तांनी, मा.महापौर यांनी मा.जिल्हाधिकारी, मा.प्रधान सचिव यांना वेळोवेळी पत्र देऊन सन १९९९ पासून ते २००६ पर्यंतची १२ कोटी ३१ लाख रूपये शासनाकडुन येणे (एन.ए.) बाकी आहे. सन २००६ ते २०१० पर्यंतचे एन.ए.ची वसुलीचा आकडा सांगण्यात येत नाही. आज रोजी महाराष्ट्र शासनाकडुन १५ कोटी रूपये एन.ए.चे येणे बाकी आहेत. ५ टक्के रक्कम अधिकची शासन देत आहे. ८० टक्के रक्कम मनपाला व २० टक्के रक्कम शासनाकडे जाणार आहे. सभागृहास विनंती करण्यात येते की, जोपर्यंत १५ कोटी रूपये शासनाकडुन येत नाही तो पर्यत एन.ए.ची वसुली करू नये. सन १९९९ पासूनची थकबाकी आहे. शहरात रोजगार हमी योजनेची जेवढी डिमांड आहे समजा ५ कोटी असतील व वसुली २ कोटी असेल तर मा.जिल्हाधिकारी यांचे कडुन पुर्ण पैसे जमा करा म्हणुन नोटीस येते नाहीतर मा.आयुक्तांच्या दालनास लॉक लावण्यात येईल म्हणुन कळविण्यांत येते. डिमांड एवढी वसुलीच झाली नाही तर ती देणार कशी त्यामुळे रोजगार हमी कर, शिक्षण कर, वृक्ष कर किंवा एन.ए. कर सर्व महानगरपालिकेला मिळाला पाहिजे. जोपर्यंत १५ कोटी रूपये येणे होत नाही तोपर्यंत मनपाने एन.ए.ची वसुली करू नये. यामुळे नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल. गेल्या दिड

वर्षापासून विधानसभा, लोकसभा निवडणुकीच्या कामाकरीता कर्मचारी गेलेले आहे ते आजपर्यंत आलेले नाही तर वसुली कशी होईल वसुलीवर याचा परिणाम होत आहे. ५ टक्केंमधे स्टेशनरीचेही काम होणार नाही. ९० टक्के द्यायला पाहिजे. १५ कोटी थकबाकी येत नाही तोपर्यंत मान्य करू नये.

श्री.विनायक पांडे : मालमत्ता,पाणीपट्टी करासाठी कर्मचारी वसुलीकरीता जात आहे एन.ए.च्या माध्यमातून पुन्हा एकदा नागरीकांचा रोष येउ शकतो. यासंदर्भात समन्वयाने एक बैठक झाली व आज पर्यंत एन.ए.ची वसुली त्यांची किती झाली याचा लेखाजोखा दिल्यास त्यानंतर एन.ए.ची वसुली करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : १५ कोटी थकबाकीसाठी मनपातर्फे पाठपुरावा करण्यात यावा. एन.ए.ची जी वसुली केली जाणार आहे ती शासनास देण्याची गरज नाही सर्व मनपाकडे जमा करून घ्यायचे. जेव्हा शासनाकडुन मागणी होईल तेव्हा सांगण्यात यावे की १५ कोटी मधुन वळती केली. १५ कोटी रूपये येईपर्यंत एन.ए. मनपाकडे जमा रहावे अशी माझी विनंती आहे. एन.ए.संबधात सर्वंच महानगगरपालिकेला वसुल करण्यासाठी शासनाने आदेश दिलेले आहे त्यास आपण अपवाद राहता कामा नये. जो पैसा वसुल होणार आहे तो महानगरपालिकेकडेच राहील याची व्यवस्था करण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे : एन.ए. वसुल करणार आहे ते महानगरपालिकेच्या हद्दीमधे वसुल करणार आहे का? सात बारा त्यांचे नांवावर आहे त्यांचेकडुन वसुल करतो का? की सिटी सर्व्हे ज्यांच्या नांवावर यांचेकडुन वसुल करतो. प्रशासनाने खुलासा करावा.

कर निर्धा.व संकलक : एन.ए.ची आकारणीचे अधिकार आज रोजी मा.जिल्हाधिकारी यांनाच आहे. मनपा क्षेत्रामध्ये वसुलीचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात आलेले आहे त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातुन जी आकारणी होईल त्याचे वसुलीचे अधिकार/जबाबदारी मा.आयुक्त यांना राहणार आहे.स.सदस्य श्री.सिताराम सुरे यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार एन.ए.ची आकारणी सात बाराप्रमाणे होते की, सिटी सर्वे प्रमाणे होते. एन.ए.ची नोंद सातबारावर घेणे बंधनकारक आहे नियमानुसार ज्यावेळेला जमीन अकृषी होते त्यावेळी जमीन अकृषी झाल्याबाबतची नोंद सातबारावर येणे आवश्यक आहे. तशा नोंदी जिल्हाधिकारी कार्यालयाने पाठविण्यास सुरवात केलेली आहे. आकृषी कर आकारणी गावठाण क्षेत्रामधे रहिवास भागावरती होत नाही. त्या ठिकाणी वाणिज्य, औद्योगिक वापर असेल.

मा.सभापती :पीआर कार्डमध्ये स्पष्ट असते की, अकृषी लिहिलेले असते त्यावरती अ लिहीलेले असते. सारा माफी असतो त्याचेवर एन.ए. आकरणी असते.

कर निर्धा.व संकलक : गावठाणच्या बाहेरील सर्व इमारती वरती अकृषी वापर झालेल्या सर्व इमारतींमध्ये अकृषी कर लागतो. २००७ ते २०११ या कालावधीचे एन.ए. कर आकारणीचे दर शासनाने औरंगाबाद मनपा क्षेत्रासाठी ३७ महसुली गावाचे दर ठरवुन दिलेले आहे. एन.ए.ची वसुली करणे हा अधिकार राहणार आहे. मागच्या थकबाकीची वसुली मनपा करणार नाही. सन २००९-२०१०

ची जी चालु मागणी आहे आणि पुढील जी मागणी राहील त्याची वसुली मनपाला करायची आहे.

मा.सभापती : एन.ए.ॲसेसमेंट करण्याचे अधिकार मनपाला नाही फक्त वसुल करण्याचे अधिकार आहे.

श्री.सिताराम सुरे :सात बारा संदर्भात जो खुलासा केलेला आहे, त्यात १८ गांवाना जर पीआर कार्ड दिले तर काय हरकत आहे.

मा.सभापती : मनपाचा अधिकार नाही. सन १९७१ मध्ये जो सर्वे झाला त्यामधे जे पीआर कार्ड झालेले आहे, त्यानंतर कुठलाही सर्वे झालेला नाही.

श्री.सिताराम सुरे : मा.जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात यावे अशी विनंती आहे. महसुली गांवाना पीआर कार्ड लागु करावे.

श्री.प्रशांत देसरडा : १५ कोटीची थकबाकी शासनाकडे बाकी आहे. थकबाकी जिल्हाधिकारी कार्यालय यांनी वसुल करायची आहे. ५ टक्के रक्कम ही परवडत नाही १० टक्क्याची मागणी शासनाकडे करण्यात यावी. १५ कोटीची थकबाकी दरवर्षी कपात केली/वसुल करण्यासाठी शासनाची मंजूरी घ्यावी लागणार आहे. तशी कपात करू शकणार नाही. वाळुज,सांवगी,पैठण येथील टोल नाक्याची पावती बघीतल्यास पावतीवर वरती लिहीलेले आहे की, शहर विकास निधीसाठी हा टोल घेण्यात येतो. नगर रोड सोडला तर बाकीचे दोन टोल नाके शहराच्या विकासासाठी वसुल करीत होते. जवळपास १०० कोटींच्यावर वसुल झाले शासनाने फक्त सेव्हन हिल येथील उड्डाणपुल दिला. त्यात १० टक्के रक्कम मनपाचे आहे. १७६ कोटींची स्किम आणि वसुल झालेले करोडो रूपये यामधुन मनपास काहीही मिळालेले नाही. रोजगार हमीचा कर नाही म्हणुन मा.आयुक्तांच्या कॅबीनला सिल लावण्याची धमकी दिली जाते. स.सदस्य श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर यांनी सांगीतल्या प्रमाणे १५ टक्के रक्कम शासनास देवु नये.

श्री.सिताराम सुरे : महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव ठेवुन तो पास करून पुणे येथे पाठविण्यात यावा. सातबारावर लिहीण्यासाठी जागा नाही त्यास जोड पाने लावावे लागतात. पी.आर. कार्डसाठी प्रशासनाने तयारी करावी.

मा.सभापती : विषय क्रमांक २९० अकृषी कराबाबतच्या प्रस्तावावर सभागृहातझालेल्या सविस्तर चर्चेनुसार ज्येष्ठ सदस्य दत्ताभाऊ पाथ्रीकर यांनी सांगितल्याप्रमाणे शासनाकडून जे १५ कोटी यायचे आहेत, अपण एन.ए. च्या मार्फत जे जमा होतील त्यातून २०% जे शासनास द्यायचे आहेत ते देवू नये. आणि ते १५ कोटीच्या थकबाकीतून वळती करावेत. या दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे करीता वॉर्ड कार्यालय 'अ' ते 'फ' अंतर्गत मालमत्ता कर व पाणीपट्टी करासोबत अकृषी कराची रक्कम वसूल करणेसाठी सर्व वॉर्ड अधिकारी यांना अधिकार प्रदान करणेस सर्वानुमते मंजुंरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेकडे अकृषी सारापोटी जमा होणाऱ्या रक्कमेतून २०% रक्कम शासन कोषागारात जमा न करता

शासनाकडून अकृषि सारापोटी म.न.पा.चा येणे असलेल्या वाट्याची रक्कम सुमारे १५ कोटी थकबाकीतून वळती करावेत या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९१ :**

कार्यकारी अभियंता वॉर्ड ब आणि क यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२० आंबेडकरनगर (स्लम) येथील ग्रीव्हज कंपनी ते एमआयडीसी कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला कॉंक्रीटीकरण करणे या कामाच्या र.रू.१५,०१,६८८/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा विषय क्र.१६३ दि.१३/११/२००९ अन्वये मान्यता प्राप्त झाली असून त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.चांदराम एन. आशन्ना | २१.९९% कमी |
| २. | श्री.के.बी.पाथ्रीकर | १९.२% कमी |
| ३. | श्री.रमेश बी. रूडसमुद्र | १८.५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.चांदराम एन.आशन्ना यांची अं.प.दरापेक्षा २१.९९% कमी दराची असून सदर निविदेस मा.आयुक्त यांची दि.१५/१२/२००९ रोजी मान्यता प्राप्त झाली असून सदरील निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२० आंबेडकरनगर (स्लम) येथील ग्रीव्हज कंपनी ते एमआयडीसी कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २१.९९% कमी दराची श्री.चांदराम एन. आशन्ना यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९२ :**

कार्यकारी अभियंता वॉर्ड ब आणि क यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२० आंबेडकरनगर (स्लम) येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्या समोरील रस्त्याचे कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाच्या र.रू.१९,९३,७५३/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा विषय क्र.१६२ दि.१३/११/२००९ अन्वये मान्यता प्राप्त झाली असून त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | आरबाज कन्स्ट्रक्शन | २५.०१% कमी |
| २. | श्री.चांदराम एन. आशन्ना | २४.९९% कमी |
| ३. | श्री.के.बी.पाथ्रीकर | २१.२१% कमी |
| ४. | श्री.रमेश बी. रूडसमुद्र | १७.००% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा आरबाज कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा २५.०१% कमी दराची असून सदर निविदेस मा.आयुक्त यांची दि.११/१२/२००९ रोजी मान्यता प्राप्त झाली असून सदरील निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२० आंबेडकरनगर (स्लम) येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्या समोरील रस्त्याचे कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २५.०१% कमी दराची आरबाज कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : विषय क्रमांक २९१ आणि २९२ मंजूर करत आहे. माझ्या वार्डात डांबरीकरण होत आहे त्याचे जे थिकनेस दिलेले आहे ती तपासण्यात यावी. विषय क्रमांक २९३, २९४ चे जे प्रस्ताव आहेत २८/२९ टक्के बिलोमधे आलेली आहे पुर्वीही कामे रद्द केलेली आहे ही कामेही शॉर्ट टेंडरमध्ये परत मागविण्यात यावेत.

मा.सभापती : विषय क्रमांक २९३,२९४,२९५ रद्द करण्यात येतो. प्रशासनाने या संदर्भात शॉर्ट टेंडर काढुन स्थायी समितीमध्ये ठेवण्यात यावे.

**<u>विषय क्र. २९३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६५ अंतर्गत सिंधी कॉलनी, कुशलनगर, रामानंद कॉलनी, बँक कॉलनी, चेतनानगर इ. (उर्वरीत रस्ते) भागात विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.२३,०९,३००/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा दि.२१/१२/२००९ विषय क्र.७८७ नुसार मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ४ निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ४ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.एम.ए.सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा २८.८८% कमी |
| २. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा २३.०८% कमी |
| ३. | मे.राजेंद्रसिंग अजितसिंग | अं.प.दरापेक्षा २२.०५% कमी |
| ४. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा १०.००% कमी |

उपरोक्त प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.एम.ए.सिद्यीकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.८८% कमी दराची आहे. मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.एम.ए.सिद्यीकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.८८% कमी दराची निविदा ५% Additional Security Deposit व ३ वर्ष DLP च्या अटीवर मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा, प्रशासनाने शॉर्ट टेंडर काढुन स्थायी समितीमध्ये ठेवण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. २९४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६५ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.२४,९९,५००/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा दि.२१/१२/२००९ विषय क्र.७७७ नुसार मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ६ निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ६ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा २९.९१% कमी |
| २. | मे.राजेंद्रसिंग अजितसिंग | अं.प.दरापेक्षा २४.९९% कमी |

३. मे.एम.ए.सिद्यीकी — अं.प.दरापेक्षा २४.८७% कमी
४. मे.अरोरा कन्स्ट्रक्शन कंपनी — अं.प.दरापेक्षा २४.६६% कमी
५. मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन कंपनी — अं.प.दरापेक्षा २१.२१% कमी
६. मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी — अं.प.दरापेक्षा १७.९९% कमी

उपरोक्त प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९१% कमी दराची आहे. मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.९१% कमी दराची निविदा ५% Additional Security Deposit व ३ वर्ष DLP च्या अटीवर मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा, प्रशासनाने शॉर्ट टेंडर काढुन स्थायी समितीमध्ये ठेवण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २९५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी विरंजक चुर्ण (ब्लिचिंग पावडर) चा पुरवठा करणेबाबतच्या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १२,०१,२००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि.१५.६.२००९ रोजी विषय क्र.११ अन्वये मान्यता प्राप्त झाल्यानुसार सदरील कामाची रितसर निविदा कार्यवाही अंतर्गत खालील प्रमाणे दर प्राप्त झाले.

१. श्री. क्लोरोकेम इंडस्ट्रीज — रक्कम रू.१२,९६०/- प्रति मे. टन
२. मे.फोनीक्स केमिकल्स — रक्कम रू.१२,६८४/- प्रति मे. टन

उपरोक्त नुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच रक्कम रू.१२,६८४/- प्रति मे. टन मे. फोनीक्स केमिकल्स यांचे दर आहेत. उक्त दराचे निविदेस मा. आयुक्त महोदय यांनी दि.३/१२/२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

करीता मे. फोनीक्स केमिकल्स यांच्याकडून प्राप्त निविदा दराने रक्कम रूपये १२,६८४/- प्रति मे. टन दराने मो.हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी विरंजक चूर्ण (ब्लिचिंग पावडर) खरेदी करण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा, प्रशासनाने शॉर्ट टेंडर काढुन स्थायी समितीमध्ये ठेवण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २९६ :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०९ नंदनवन कॉलनी येथे जिम्नॅशीयम हॉल, सांस्कृतिक हॉल, बॅडमींटन हॉल बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. विभाग दरसुची सन २००५-०६ नुसार तयार करण्यात आले असून अं.प.रक्कम रू.१८,६५,१००/- आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात व्यापारी संकुल व इतर इमारती, या लेखाशिर्ष अंतर्गत स्पील ओव्हर कामामध्ये प्रस्तावित आहे. मा.स्थायी समिी सभा विषय क्र.१५३, दिनांक ७/११/२००६ अन्वये अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर कामाच्या निविदा सुचना पत्राद्वारे मागविण्यात आल्या असता ई-टेंडरींग विभागाने दिलेल्या अहवालानुसार एकमात्र (०१) निविदा विक्री झाली व स्वीकृतीच्या अंतिम तारखेस दि.१५/४/२००८ रोजी मे.हायवे कन्स्ट्रक्शन यांची १३.८९% जास्त दराची निविदा दर भरून प्राप्त झाली आहे.

वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८९% जास्त दराची निविदा मे. हायवे कन्स्ट्रक्शन यांची आहे. त्यास दिनांक २/१२/२००९ रोजी मा. आयुक्त महोदय यांची मंजुरी झाली आहे. मे. हायवे कन्स्ट्रक्शन यांची १३.८९% जास्त दराच्या निविदेनुसार कामास एकूण रू.२१,२४,१६२/- खर्च अपेक्षीत आहे. तरी १३.८९% जास्त दराची मे. हायवे कन्स्ट्रक्शन यांची निविदा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा : विषय क्रमांक २९६ एकमात्र निविदा सुचनापत्राद्वारे मागविण्यात आल्या असता ई टेंडरींग विभागाने दिलेल्या अहवालानुसार निविदा दर भरून प्राप्त झाली आहे.

मा.सभापती : ई-टेंडरीग विभागाने दिलेल्या अहवालानुसार एकमात्र निविदा प्राप्त झाली.

श्री.प्रशांत देसरडा : मंजूर करण्यास हरकत नाही. सुचना पत्रकद्वारे मागविण्यात आले, जुनी जी पध्दत होती त्या पध्दतीने निविदा काढली काय?

मा.सभापती : संबधीत अधिकारी थोडया वेळात याबाबतीत खुलासा करीत आहे.

मा.सभापती : ऐनवेळीचा शहागंज येथील विषय आहे. तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेब असतांना त्यावेळी शहागंज येथील दुकांनाचा विषय आला होता ५० फुटाचा रोड होता त्यावेळी प्रस्ताव मंजूर केला होता.

मा.सभापती : विषय क्रमांक २९६ बाबत माहीती देण्यात यावी.

श्री.प्रशांत देसरडा :विषय क्रमांक २९६ मध्ये सदर कामाच्या निविदा सुचना पत्राद्वारे मागविण्यात आल्या व हे काम स्पिल ओव्हरमध्ये प्रस्तावित याबाबतीत खुलासा करण्यात यावे.

अति.शहर अभियंता : मागच्या वर्षी हे काम मंजूर झालेले होते परंतु कार्यवाही झालेली नव्हती.

श्री.सतिष कटकटे : शॉर्ट टेंडर बाबत माहीती द्यावी.

मा.सभापती : विषय क्रमांक २९६ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.०९ नंदनवन कॉलनी येथे जिम्नॅशीयम हॉल, सांस्कृतिक हॉल, बॅडमींटन हॉल बांधणे या कामासाठी प्राप्त झालेली मे.हायवे कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.८९% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

मा.सभापती :ऐनवेळीचा शहागंज येथील विषय आहे. तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेब असतांना त्यावेळी शहागंज येथील दुकांनाचा विषय आला होता ५० फुटाचा रोड होता त्यावेळी प्रस्ताव मंजूर केला होता.

नगर सचिव : विषय क्रमांक २९७ वाचून सभागृहास वाचून दाखवितात.

मा.सभापती : २४ नोव्हेंबर रोजीच्या बैठकीत विषय क्रमांक २१८ मंजूर केला होता तो ठराव रद्द केलेला आहे प्रस्तावावर कुठलीही कारवाई प्रशासनाने करू नये. विषय क्रमांक २१८ हा विषय क्रमांक २९७ अन्वये रद्द करण्यात येतो. ऐनवेळीचे विषय सभागृहास वाचून दाखविण्यात यावे.नगर सचिव : ऐनवेळचे विषय सभागृहास वाचून दाखविण्यात आले.

मा.सभापती : मंजूर. प्रशासनाच्या वतीने ऐनवेळीचे विषय मंजूर करण्यात येतात.

**विषय क्र. २९७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहागंज येथील लहान व्यावसायिक/स्टॉल धारकांची दुकाने अतिक्रमण हटाव मोहिमे अंतर्गत निष्काशीत केल्यामुळे दिनांक 24 नोव्हेंबरच्या स्थायी समिती सभेत प्रस्तावित केल्यानुसार अ.क्र.1 ते 10 मधील स्टॉल धारकांना शहागंज आरोग्य केंद्राजवळ 6x4 फुट जागा भाडेपट्ट्यावर देण्याबाबतचा ठराव क्र. 218 दि.24/11/09 अन्वये मंजूर झाला आहे. परंतु 50 फुट रस्त्यावर जागा देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. तथापी अनवधानाने सदर ठराव मंजूर झाला होता. तरी स्थायी समितीचा ठराव क्र.218 दि.24/11/2009 रद्द करण्यात यावा.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सिताराम सुरे, प्रशांत देसरडा अनुमोदक : प्रल्हाद निमगांवकर, नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज येथील लहान व्यावसायिक/स्टॉल धारकांची दुकाने अतिक्रमण हटाव मोहिमे अंतर्गत निष्काशीत केल्यामुळे दिनांक 24 नोव्हेंबरच्या स्थायी समिती सभेत प्रस्तावित केल्यानुसार अ.क्र.1 ते 10 मधील स्टॉल धारकांना शहागंज आरोग्य केंद्राजवळ 6x4 फुट जागा भाडेपट्ट्यावर देण्याबाबतचा स्थायी समितीचा ठराव क्र. 218 दि.24/11/09 रद्द करण्यात येतो. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९८ :**

कार्यकारी अभियंता (इ व फ), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभग क्र.७७ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याचे सन २००८-२००९ चे जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.१९,९६,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांची दि.२.१.२०१० अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदरचा खर्च सन २००९-१० मध्ये नवीन डांबरी रस्ते शहरी भाग जीबीआर-ई-३ अ.क्र.६ रू.२०.०० लक्ष मधून करणत येईल. सबब सदर कामासाठी रक्कम रू.१९,९६,७००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभग क्र.७७ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९६,७००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कर्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३३ गुलमंडी भागात विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,८०,०००/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मंजूरी देऊन प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यास शिफारस केलेली आहे.

तरी रक्कम रू.१४,८०,०००/-चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३३ गुलमंडी भागात विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,८०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०० :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिंधी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.११,९९,६५०/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च शहरी भागात पुनःर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षा खाली प्रस्तावित आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.११,९९,६५०/- चे अदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिंधी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.११,९९,६५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थीनींना शैक्षणिक मदत होणेचे दृष्टीने लेडीज सायकल देणे बाबतच्या प्रस्तावास महिला व बालकल्याण समिती सभा दि.२६/८/२००९ च्या विषय क्र.०८ अन्वये मान्यता देणेत आली आहे. समितीने मान्य केलेला मुळ ठराव यासोबत जोडण्यात आले आहे.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत महिला व बालकल्याण समिती तर्फे दुचाकी लेडीज सायकल गरजु विद्यार्थीनींसाठी योजना राबविण्यात येते. या खरेदी साठी सदरील खरेदी प्रक्रिया शासन निर्णय दिनांक ०२ जानेवारी १९९२ अन्वये करणे बाबतच्या मंजुरीस्तव सादर.

सदरील उपक्रमास येणारा खर्च अंदाजे रू.१२,९८,०००/- (रू.बारा लाख अठ्ठ्याण्णव हजार) इतका अपेक्षीत आहे. सदरील खरेदी सन २००९-२०१० च्या महिला व बालकल्याण च्या अर्थसंकल्प तरतुदीमधून करण्यात येईल. करीता खरेदीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थीनींना शैक्षणिक मदत होणेचे दृष्टीने लेडीज सायकल देणेसाठी महिला व बालकल्याण समिती तर्फे दुचाकी लेडीज सायकल गरजु विद्यार्थीनींसाठी या योजने अंतर्गत सायकल खरेदीसाठी शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ नुसार खरेदी प्रक्रिया करणे तसेच यासाठी लागणाऱ्या अंदाजे रू.१२,९८,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद टाईम्स कॉलनी मध्ये असलेल्या तीन ओपन स्पेस पैकी दोन ओपन स्पेसवर 20x30 चे प्लॉट पाडून कब्जा केला. आता फक्त एकच ओपन स्पेस शिल्लक असून त्यावर जवळपास 2000 स्केअर फुट अतिक्रमण झालेले आहे. उर्वरीत भूखंडाचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक असून महानगरपालिकेची खुली जागा विकसीत करण्याची विनंती स्थानिक नागरीकांनी केली असून या खुल्या जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महानगरपालिकेच्या जागेचे संरक्षण होण्याचे दृष्टीने व नागरीकांना खुल्या जागेचा उपयोग व्हावा

याकरीता नागरीकांचे व स.सदस्यांचे विनंतीवरून मा.सभापती यांचे समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता रेखांकनातील खुली जागा तातडीने विकसीत करणे, या ठिकाणी जॉगींग ट्रॅक तयार करणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, रंगकाम करणे, जाळ्या बसविणे इत्यादी कामे तातडीने करणे आवश्यक असून त्यासाठी रक्कम रू.23,99,900/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष स्थळपाहणीचे वेळी मा.सभापती, मा.आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार सदरचे काम तातडीने करून घेण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदार मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : मेहरून्नीसा खान अनुमोदक : प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद टाईम्स कॉलनी मधील खुल्या जागेवर झालेले अतिक्रमण होण्याची शक्यता लक्षात घेता मनपाच्या जागेचे संरक्षण होण्याचे दृष्टीने व नागरीकांना खुल्या जागेचा उपयोग व्हावा याकरीता नागरीकांचे व स.सदस्यांचे विनंतीवरून रेखांकनातील खुली जागा तातडीने विकसीत करणे अंतर्गत या ठिकाणी जॉगींग ट्रॅक तयार करणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, रंगकाम करणे, जाळ्या बसविणे इत्यादी कामे तातडीने करून घेण्यासाठी रक्कम रू.23,99,900/- चे अंदाजपत्रकास अधीन राहून मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदार मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०३ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.९० एकनाथनगर येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून त्यानुसार कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,९७,५७०/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली असून या कामाचा खर्च नवीन डांबरी रस्ते (शहरी भाग) या लेखाशिर्षा खाली प्रस्तावित आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.१४,९७,५७०/- चे अदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९० एकनाथनगर येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,९७,५७०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ६७ मध्ये विविध ठिकाणी पथदिवे नसल्यामुळे अंधारामुळे नागरीकांना त्रास होत आहे. या भागात उर्जा बचत दिवे लावणे आवश्यक आहे. या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. या भागातील नागरीकांचे तक्रारी असुन स.सदस्यांची काम लवकर करण्याची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.६७ मध्ये विविध ठिकाणी उर्जा बचतीचे दिवे लावणे - ५.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ६७ मध्ये विविध ठिकाणी पथदिवे नसल्यामुळे उर्जा बचत दिवे लावणे आवश्यक असल्याने नागरीकांचे तक्रारी व स.सदस्यांचे मागणी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार वॉर्ड क्र. ६७ मध्ये विविध ठिकाणी उर्जा बचतीचे दिवे लावणेचे रू.५.०० लक्ष चे काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ९८ अंतर्गत विटखेडा, कांचनवाडी, नक्षत्रवाडी येथील गटार पुर्णपणे तुटलेली असल्याने रस्त्यावरून घाण पाणी वाहात असून नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. या ठिकाणच्या तुटलेल्या गटारीची दुरूस्ती तातडीने करणे आवश्यक आहे. या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. या भागातील नागरीकांचे तक्रारी असुन स.सदस्यांची काम लवकर करण्याची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.९८ अंतर्गत विटखेडा, कांचनवाडी, नक्षत्रवाडी येथील गटार दुरूस्ती करणे- ५.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : मेहरून्नीसा खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९८ अंतर्गत विटखेडा, कांचनवाडी, नक्षत्रवाडी येथील तुटलेल्या गटारीचे घाण पाणी रस्त्यावरून वाहात असल्याने नागरीकांचे आरोग्याचा प्रश्न लक्षात घेता गटारीची दुरूस्ती तातडीने करणे गरजेचे असल्यामुळे विटखेडा, कांचनवाडी, नक्षत्रवाडी येथील गटार दुरूस्ती करणे (अं.प.र.रू.५.०० लक्ष) हे काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामानुसार कार्यवाही व्हावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. २८ अंतर्गत "सदफ कॉ. व एस.टी. कॉलनी मंजूर रेखांकनात सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे, खुल्या जागेचे संरक्षण व इतर आवश्यक कामे करणे" या कामासाठी दिनांक २१/१२/२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.८६६ अन्वये एकत्रित रक्कम रू.५५.०० लक्षची आर्थिक तरतुद उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदफ कॉलनी, कटकट गेट रेखांकनातील खुल्या जागेवर प्लॉट पाडून विक्री करण्याचा प्रयत्न झालेला आहे. या भूखंडाचे अतिक्रमणापासून संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. करीता मनपाची खुली जागा विकसीत करण्याची विनंती स्थानिक नागरीकांनी केली असून या खुल्या जागेवर अतिक्रमण होण्याची

शक्यता नाकारता येत नाही. महानगरपालिकेच्या जागेचे संरक्षण होण्याचे दृष्टीने व नागरीकांना खुल्या जागेचा उपयोग व्हावा म्हणून नागरीकांचे व स.सदस्यांचे विनंतीवरून मा.सभापती(स्था.स.), मा.आयुक्त यांचे समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता रेखांकनातील खुली जागा तातडीने विकसीत करणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष स्थळ पाहणीनुसार या कामाचे रू.१९.०० लक्षचे अंदाजपत्रक संबंधीत विभागामार्फत तयार करण्यात आले आहे. वरील बाबी लक्षात घेता मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावाअन्वये उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेले काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.२८ सदफ कॉलनी, कटकटगेट रेखांकनातील खुली जागा विकसीत करणे. १९.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक :प्रल्हाद निमगांवकर अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २१/१२/२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ८६६ अन्वये एकत्रित रक्कम रू.५५.०० लक्षचे उपलब्ध तरतुदीच्या अनुषंगाने सदफ कॉलनी, कटकट गेट रेखांकनातील खुल्या भूखंडाचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी तसेच नागरीकांना खुल्या जागेचा उपयोग व्हावा म्हणून नागरीकांचे व स.सदस्यांचे विनंतीवरून मा.सभापती(स्था.स.), मा.आयुक्त यांचे समवेत प्रत्यक्ष पाहणी केल्यानुसार या रेखांकनातील खुली जागा तातडीने विकसीत करणे गरजेचे असल्यामुळे संबंधीत विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या रू.१९.०० लक्षचे अंदाजपत्रकास अधीन राहून मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावाअन्वये उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेले काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.२८ सदफ कॉलनी, कटकटगेट रेखांकनातील खुली जागा विकसीत करणे. १९.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. २८ अंतर्गत औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील ड्रेनेज लाईन नादुरूस्त असल्याने रस्त्यावरून घाण पाणी वाहात असून नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. या ठिकाणची ड्रेनेज लाईन तातडीने बदलणे गरजेचे आहे. या कामासाठी दि.२१.१२.२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.८८४ अन्वये वॉर्ड क्र.२८ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे/दुरूस्ती करणेसाठी रू. २५.०० लक्षची तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या भागातील नागरीकांचे तक्रारी असुन स.सदस्यांची काम लवकर करण्याची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता उपलब्ध तरतुदीस अधीन राहून खालील दर्शविलेलेकाम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.२८ अंतर्गत औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे ३०० मीमी व्यासाची एसडब्ल्युजी (चीनी मातीची) ड्रेनेज लाईन टाकणे - १२.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक :मेहरून्नीसा खान अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. २८ अंतर्गत औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील नादुरूस्त ड्रेनेज लाईनमुळे नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण झालेला असल्या कारणाने दि.२१.१२.२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.८८४ अन्वये उपलब्ध करून देण्यात आलेल्या तरतुदीस अधीन राहून, या भागातील नागरीकांचे तक्रारी व स.सदस्यांची काम लवकर करण्याची मागणी लक्षात घेता उपलब्ध तरतुदीस अधीन राहून खालील दर्शविलेले काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

वॉर्ड क्र.२८ अंतर्गत औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे ३०० मीमी व्यासाची एसडब्ल्युजी (चीनी मातीची) ड्रेनेज लाईन टाकणे - १२.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. २८ अंतर्गत "सदफ कॉ. व एस.टी. कॉलनी मंजूर रेखांकनात सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे, खुल्या जागेचे संरक्षण व इतर आवश्यक कामे करणे" या कामासाठी दिनांक २१/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.८६६ अन्वये एकत्रित रक्कम रू.५५.०० लक्षची आर्थिक तरतुद उपलब्ध करून देण्यात आली आहे. या तरतुदीतून खालील कामे तातडीने करावयाची असून नागरीकांचे तक्रारी व स.सदस्यांची काम लवकर करण्याची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावाअन्वये उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत सदफ कॉलनी, एस.टी.कॉलनी येथे उर्वरीत कॉंक्रेटींग करणे. | १०.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत युनुस कॉलनी येथे कॉंक्रेटींग करणे व इतर आवश्यक कामे करणे. | १०.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत एस.टी. कॉलनी मंजूर रेखांकनात उर्वरीत कॉंक्रेटींग करणे. | १०.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत त्रिमुर्ती कॉलनी येथे उर्वरीत कॉंक्रेटींग करणे. | ०५.०० लक्ष |

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक :प्रल्हाद निमगांवकर अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २१/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.८६६ अन्वये वॉर्ड क्र. २८ अंतर्गत "सदफ कॉ. व एस.टी. कॉलनी मंजूर रेखांकनात सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे, खुल्या जागेचे संरक्षण व इतर आवश्यक कामे करणे" या कामासाठी एकत्रित रक्कम रू.५५.०० लक्षची आर्थिक तरतुद उपलब्ध करून देण्यात आल्यानुसार या तरतुदीतून खालील कामे तातडीने करावयाची असून नागरीकांचे तक्रारी व स.सदस्यांची काम लवकर करण्याची मागणी लक्षात घेता मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावाअन्वये उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली

कामे मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

| | | |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत सदफ कॉलनी, एस.टी.कॉलनी येथे उर्वरीत कॉंक्रेटींग करणे. | १०.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत युनुस कॉलनी येथे कॉंक्रेटींग करणे व इतर आवश्यक कामे करणे. | १०.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत एस.टी. कॉलनी मंजूर रेखांकनात उर्वरीत कॉंक्रेटींग करणे. | १०.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत त्रिमुर्ती कॉलनी येथे उर्वरीत कॉंक्रेटींग करणे. | ०५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३०९ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. २८ अंतर्गत नेहरूनगर व इतर विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन नादुरूस्त असल्याने रस्त्यावरून घाण पाणी वाहात असून नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. या ठिकाणची ड्रेनेज लाईन तातडीने बदलणे गरजेचे आहे. सदर काम तातडीने करणे आवश्यक आहे. या कामासाठी दि.२१.१२.२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.८८४ अन्वये वॉर्ड क्र.२८ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे/दुरूस्ती करणेसाठी रू. २५.०० लक्षची उपलब्ध करून देण्यात आलेल्या तरतुदीतून हे काम करण्यात यावे. या भागातील नागरीकांची तसेच स.सदस्यांची काम लवकर करण्याची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता उपलब्ध तरतुदीस अधीन राहून खालील दर्शविलेले काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.२८ अंतर्गत नेहरूनगर व इतर विविध ठिकाणी ३०० मी.मी.
व्यासाची एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणे. - १३.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक :मेहरून्नीसा खान अनुमोदक : सतीश कटकटे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. २८ अंतर्गत नेहरूनगर व इतर विविध ठिकाणी नादुरूस्त ड्रेनेज लाईनमुळे नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण झालेला असल्या कारणाने दि.२१.१२.२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.८८४ अन्वये उपलब्ध करून देण्यात आलेल्या तरतुदीतून सदरचे काम करण्यास तसेच नागरीकांची व स.सदस्यांची काम लवकर करण्याची मागणी लक्षात घेता उपलब्ध तरतुदीस अधीन राहून खालील दर्शविलेले काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.२८ अंतर्गत नेहरूनगर व इतर विविध ठिकाणी ३०० मी.मी.
व्यासाची एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणे. - १३.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहानुरवाडी येथील हजरत शाहनुर मियाँ हमवी (रह) या कब्रस्तान परिसरात सध्या पाण्याची पाईपलाईन नसल्याने तेथे दफन विधी करण्यास फार त्रास होत आहे. प्रेताची विल्हेवाट लावणे अत्यंत गरजेचे असते. त्यासाठी पाणी आवश्यक असते. करीता इतर कब्रस्तानमध्ये ज्याप्रमाणे पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे त्याच प्रमाणे या कब्रस्तानात मनपातर्फे कोणत्याही व्यासाची पाईपलाईन टाकण्यात यावी. जेणे करून येथे होणारा त्रास दुर होण्यास मदत होईल.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :मेहरून्नीसा खान अनुमोदक : मोमीन सफिया फिरदौस

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथील हजरत शाहनुर मियाँ हमवी (रह) या कब्रस्तान परिसरात सध्या पाण्याची पाईपलाईन नसल्याने तेथे दफन विधी करण्यास होणारा त्रास दुर होण्यासाठी इतर कब्रस्तानमध्ये ज्याप्रमाणे पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे त्याच प्रमाणे या कब्रस्तानात मनपातर्फे पाण्याची पाईपलाईन टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.सभापती : मा.आयुक्त बैठकीस येत आहेत. दहा मिनिटांसाठी सभा तहकुब करण्यात येते. (सायंकाळी ५.२० वा. पुन्हा सभेला सुरूवात.)

चर्चा :

श्रीमती सफिया मोमीन : मा.आयुक्त यांचे वाहनावरील अंबर दिवा काढण्यात आलेला आहे नियमानुसार त्यांचे वाहनावर दिवा असतो औरंगाबाद सारख्या मोठया शहरात मा.आयुक्तांच्या वाहनावरील दिवा काढण्यात आला त्याचा आम्ही निषेध करतो.

प्रशांत देसरडा :मागील वर्षीही असाच प्रकार हया ठिकाणी झाला होता. मा.आयुक्त,मा.महापौर,नगरसेवक किंवा अधिकारी असो शेवटी आपले जीवन व ज्या माध्यमातुन जीवन जगतो त्याच्यावर त्याची कामाची पध्दत असते. महानगरपालिकेचे सर्वसाधारण सभेचे काम चालतांना एखादया नगरसेवकाचा प्रस्ताव मंजूर न झाल्यास तो राजदंडा जवळ येतो आणि तो राजदंड पळविण्याच्या स्थितीत असतो त्याची आमची अशी धारणा असते की, राजदंड पळविला की, सर्वसाधारण सभा चालू शकत नाही. म्हणुन राजदंड पळविण्याचा प्रयत्न होतो परंतु घटनेत असे कुठेच नाही की, राजदंड पळवुन नेला किंवा राजदंड सर्वसाधारण सभेत असणे गरजेचे आहे असे कुठे नाही. ती एक प्रथा आहे. राजकर्त्याची ती एक निशानी आहे. त्यामुळे मा.महापौरांचा लाल दिवा असो की, मा.आयुक्तांच्या वाहनावरील पिवळा दिवा असो. एखादया अधिकाऱ्याचा स्केल उपआयुक्तांच्या स्केलपैक्षा जास्त असतो. शासनाने काही गोष्टी अलीखीत दिलेल्या असतात त्याचे पालन करणे त्या फोरममधे बसणे. मा.महापौर किंवा मा.आयुक्त हे शहरातील एक पद आहे त्यामुळे त्यांना हजारो नागरीकांपुढे जावे लागते. नागरीकांच्या निवेदनासाठी जावे लागते कधी कधी रस्ता रोको होतो. प्रत्येक वेळेस त्यांचे बरोबर पोलीस असेल कशावरून त्यामुळे शासनाची जी काही प्रथा आहे सन १९८८ पासुन जी प्रथा आहे तसा तो मानाचा विषय आहे. एखादया वेळेस नागरीकांनी मा.आयुक्त, मा.महापौर यांच्या विरूध्द निदर्शने केली किंवा मा.आयुक्त, महापौर, पदाधिकारी यांचेवर एखादया शिष्टमंडळाने ॲक्शन घेण्याचे काम केले तर त्या नागरीकांना कळावे, पोलीसांना कळावे प्रोटोकॉल प्रमाणे दिवा पाहिजे. गेल्या अडीच वर्षापासून शासनाकडे एक प्रस्ताव पाठविलेला आहे त्या प्रस्तावावर आज जर निर्णय झाला असता तर हा जो वादाचा विषय आहे तो झाला नसता. मा.आयुक्त असो की तत्कालिन आयुक्त असो ते सकाळ पासून ते रात्री आठ ते नउ वाजेपर्यंत काम करतात ते उद्या सांगू शकतील की सहा नंतर मी एकही संचिका बघू शकणार नाही.

नागरीकांना भेटणार नाही. काही गोष्टी हया प्रथा प्रमाणे, सुरक्षेप्रमाणे काही प्रॉटोकॉलनुसार या आपल्याला मान्य करणे गरजेचे आहे. काल जी काही गोष्ट झाली तीचा नगरसेवक या नात्याने एक नागरीक या नात्याने निषेध करतो. मागच्यावेळेसही असाच प्रकार घडला होता. एखादे काम झाले नाही तर मा.आयुक्त,मा.महापौर,मा.सभापती यांना भेटले पाहिजे त्यांचेशी चर्चा केली पाहिजे निवेदन देऊन शिष्टमंडळ भेटले पाहिजे. ही लोकशाही पध्दत आहे. लोकशाहीच्या माध्यमातुन झाले नाही तर तुम्ही उपोषणाला बसा. ही जी पध्दत आहे ती चुकीची पध्दत आहे. सर्व पदाधिकारी मिळुन हा विषय मिटला पाहिजे. हा विषय इथपर्यंत सिमीत नाही हा अधिकाऱ्यांच्या राजकारणाच्या दबावाच्याखाली आहे. अजुनही वेळ गेलेली नाही सर्व अधिकाऱ्यांनी एकत्र बसावे चर्चा घडुन आणावी आणि चर्चेच्या माध्यमातून जो कुणी महापौर,आयुक्त असेल त्यांनी बसुन निर्णय घ्यावा एकमेंकांवर ढकलण्याचे काम सुरू आहे. एखाद्याचा यामधे बळी जाईल. एखाद्याची नौकरी जाणे हे सुध्दा त्यास जिवनातुन उठविल्यासारखे होईल. हा जो राजकरणाचा विषय आहे काल मा.महापौरांचे स्टेटमेंट ऐकले,मा.आयुक्तांचे लाल दिव्यांचे वाचण्यात आले. राजकरणामुळे एखादा जेई,नगरसेवक,सामान्य नागरीक अडकले तर कधी कधी सामान्य जनतेचे कामे हे राजकरणामुळे होत नाही. त्याही गोष्टींचा मी निषेध करतो आहे. काही चुका आमच्याकडुन,प्रशासनाकडुनही झाल्या असतील लोकशाही माध्यामातुन मा.महापौर,मा.आयुक्त यांना भेटावे आपले म्हणने सांगावे यांनी ऐकले नाही तर मा.जिल्हाधिकारी,मा.विभागीय आयुक्त,मा.पालकमंत्री यांना भेटावे. उपोषणाला बसा. सर्वांना विनंती करण्यात येते की, सर्वांनी एकत्र बसावे. यामध्ये नगरसेवक,अधिकाऱ्यांचे राजकारण असता कामा नये. नगरसेवक,माजी महापौर,पदाधिकारी यांनी सर्वांनी बसुन यावर तोडगा काढला पाहिजे.

श्री.सिताराम सुरे :स.सदस्य श्री.प्रशांतजी देसरडा यांनी जे सांगीतले त्यास माझे अनुमोदन आहे.

श्री.नारायण कुचे :काही कॉंग्रेसच्या नगरसेवकांनी तक्रार करून त्या अधिकारावर गदा आणली सर्व काही कायद्यानुसार होत नसते जो कार्यकर्ता असेल त्यांनी काही गोष्टी विचारपुर्वक केल्या पाहिजेत कायद्याच्या दुर्लक्षकरून काही कामे करावे लागतात. ज्या कॉग्रेसच्या कार्यकर्त्यांनी/नगरसेवकांनी तक्रार दिली असेल त्याचा मी निषेध करतो. सर्व सदस्यांनी मिळुन शासनाकडे याबाबतीत काहीतरी तोडगा काढण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :एसडीओ यांना दिवा आहे दिवा हा महानगरपालिकेतुन काढला जात नाही. जो माणुस ज्या पदावर असतो त्याला तो दिवा असतो त्या दृष्टीने काही गाईडलाईनस. जळगांव येथे श्री.सोनवणे यांच्या गाडीला दिवा आहे. आम्ही एवढे दुर्देवी आहे की, आम्हाला हे सहन होत नाही ही जी वृत्ती आहे ती बरोबर नाही. यामध्ये विकासाचा काही संबध नाही. यातुन फक्त ब्लॅकमेलिंग करता येते का? प्रेशर आणता येते का? हा भाग आहे. आमची व सर्व सभागृहाची अशी भावना आहे की, शासन स्तरावर व्यवस्थ्ीतपणे याची मागणी करू शकतो. रिव्हेन्युमधुन या ठिकाणी आले म्हणजे दिवा जातो का? हा महत्वाचा भाग आहे. दिवा हा त्या पदास आहे. गेल्या २० ते २५ वर्षापासून चालू आहे आणि अचानक आज का होते. याचा अर्थ जाणुनबुजून हे काहीतरी षडयंत्र घडत आहे. याचा आम्ही निषेध करतो. कोणकोणत्या पक्षाचा आहे यापैक्षा हा वृत्तीचा प्रश्न आहे याचा आम्ही निषेध करतो.

श्री.नारायण कुचे :चांगल करता येत नसेल तर वाईटही करू नये असे आमचे म्हणणे आहे.

मा.सभापती :सदरचा प्रश्न हा पक्षाचा नाही.

मा.सभापती :याबाबतीत मा.आयुक्त सभागृहास निवेदन करू इच्छितात.

मा.आयुक्त :सदरचा विषय हा बैठकीत चर्चा करण्यासारखा नाही ही प्रशासकीय बाब आहे. शासनाचे काही प्रोटोकॉल आहे त्यानुषांगाने येऊ नये परंतु आपले आयुक्त हया

पदापोटी असलेली एक आत्मीयता किंवा आपल्या महापालिकेस असलेले आयुक्त म्हणुन आपला त्याचेकडे पहाण्याचा दृष्टीकोण अत्यंत महत्वाचा आहे. आयुक्त म्हणुन मी अग्निशमन विभागाचा इनचार्ज आहे. फायरची वाहने ही माझ्या अख्यातरित्यात आहे. मला लाल दिव्याची अडचण नाही फायरची गाडी वापरायला अडचण नाही. मुद्दा असा की, जे निवेदन दिले ते आरटीओकडे दिलेले आहे. आरटीओ त्यांचे कार्यप्रणालीप्रमाणे तपासणी वैगेरे करणे आवश्यक आहे त्यांनी त्यांच्या हयाच्याप्रमाणे पहाणे हे केले पाहिजे मी स्वत: त्यांना सांगीतले की, काही मदत लागली किंवा काही सहकार्य हवे असेल तर ते घेण्यात यावे. शासनाचे काही प्रोटोकॉल असतो शासनाने काही अधिकारी डेसीग्नेट केलेले असतात, कायदा सुव्यस्था राखणारे अधिकारी, मॅजीस्ट्रेट, महसुलचे अधिकारी, फायरचे अधिकारी, ॲम्ब्युलन्स हा प्रोटोक्ॉल ठरलेला असतो. ठरलेल्या प्रमाणे मधुन मधुन आरटीओकडे काही तक्रार होत असतांत ते त्यांचे काम करतात. हा विषय गार्भियाने घेण्यासारखा नाही. आयुक्त म्हणुन अधिकार असणारच आहे. दिवा नसल्यामुळे काही फरक पडणार नाही.

मा.सभापती : मा.आयुक्तांच्या गाडीच्या दिव्याबाबत सर्वच सदस्यांनी आपला निषेध नोंदविला आहे. यासर्वबाबींची चर्चा झालेली आहे त्याचे इतिवृत्त तयार करून प्रशासनामार्फत शासनास पाठवुन देण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा : समांतर जलवाहीनीच्या वेळापत्रकाबाबत चर्चा करायची आहे. मा.नगर सचिव यांचे अभिनंदन करण्यात येते की, त्यांनी इतिवृत्तात समांतर जलवाहीनी बाबत अतिशय चांगल्या पध्दतीने व सुटसुटीत तयार केलेले आहे. आज सहा तारीख आहे २६ जानेवारी रोजी उद्घाटन आहे. दिलेल्या टाईमटेबल प्रमाणे उघडलेल्या निविदांचा तुनात्मक अभ्यास करून यशस्वी निविदाधारकांचे नांव जाहिर करणे दिनांक ०७.०१.२०१० निवीदा पुर्व बैठक झाली असेल. दिनांक ११.०१.२०१० रोजी यशस्वी निविदाधारकांची निविदा मान्यतेस्तव स्थायी समिती सभेसमोर ठेवणे याबाबत प्रशासनाची तयार कुठपर्यंत आलेली आहे. नागरीकांना आश्वासन देण्यात आलेले आहे की, समांतरचे उद्घाटन २६ जानेवारी रोजी करू व वर्षभरात त्यांना दररोज पाणी देण्यात येईल. दुसऱ्या कुठल्या पक्षाचे दबाव प्रशासनावर आहे काय खुलासा करण्यात यावा. दिनांक ११.०१.२०१० रोजी यशस्वी निविदाधारकाची निविदा स्थायी समिती समोर येणार आहे. आज रोजी यशस्वी निविदाधारकांचे उद्या किती वाजता नांव जाहिर करणांर आहे खुलासा करण्यात यावा. सदरील कामाची प्रेस कॉन्फरन्स चांगल्या हॉटेलमध्ये किंवा पत्रकार भवनमध्ये प्रेस कॉन्फरन्स घेण्यात यावी.

कार्यकारी अभियंता :सविस्तर खुलासा मागील बैठीकांमध्ये केलेला आहे. मा.आयुक्तांनी मा.सचिव श्री.मनुकुमार श्रीवास्तव यांचेशी दुरध्वनीवरून त्यावेळेला चर्चा केली होती मा.सचिव यांनीही आश्वासन दिले होते की, क्रिसीलला काम करण्यास भाग पाडू त्या आश्वासनाच्या आधारे टाईमटेबल तयार करण्यात आला होता आणि क्रिसीललाही प्रेशरराईज केले होते की, ठरलेल्या टाईमटेबल नुसार काम झाले पाहीजे. क्रिसीलचे म्हणने आहे की, एवढया कमी कालावधीमध्ये हे काम होऊ शकत नाही. २६ तारखेपर्यंत जरी हे काम होत नसले तरी तुलनात्मक अभ्यास करण्याचे काम आता पुर्ण झालेले आहे ११ लोकांनी आपल्याला प्रतिसाद दिलेला होता. आयव्हीआरसीएल आणि अशोका बीडकॉन अपात्र ठरलेले आहे. उर्वरीत क्वालिफाय झालेले आहे. ठरलेल्या वेळापत्रकानुसार उद्या यशस्वी निविदाधारकांचे नांव जाहिर करणांर आहे. दोन स्टेजमध्ये हे काम आहे आरएफपी दिनांक १५.१२.२००९ रोजी जाहीर करायचे होते त्यामध्ये काही लोकांचा खुलासा घेण्यात वेळ गेला खुलासे प्राप्त झाल्यानंतर क्रिसीलने तुलनात्मक अभ्यास केला.

मा.सभापती : महानगरपालिका क्रिसीलकडे कामाला लागली आहे काय?

कार्यकारी अभियंता : पीपीपी मॉडलसाठी केंद्र शासनाने क्रिसीलची मदत घेण्यास सांगीतली आहे. पीपीपी ऑपरेटर सलेक्टकरेपर्यंत क्रिसील आपल्यासोबत राहणार आहे त्या प्रोसेसमध्ये क्रिसील Involve आहे.

मा.सभापती :महानगरपालिकेचा सर्व कारभार क्रिसीलकडे देण्यात आलेला आहे.

श्री.प्रशांत देसरडा :माहितीस्तव कागदपत्र त्यांना इंटरनेटच्या माध्यमातुन दयायचे होते ते कळविण्यासाठी जास्तीत जास्त पाच तास लागतील त्यास मुदत सात दिवसांची देण्यात आली. क्रिसीलने टेंडर डॉक्युमेंट आलेले त्याची तपासणी करावी ते पहावे. टाईमटेबल मनपाचे ठरवुन दिला पाहीजे कायद्याची तपासणी करणे हे क्रिसीलचे काम आहे. ज्यापध्दतीने हे काम चालू आहे त्या पध्दतीत क्रिसील ही सक्षम एजन्सी वाटत नाही.

मा.सभापती : प्रशासनही त्यांचे विरोधात आहे.

श्री.प्रशांत देसरडा :मार्चच्या अगोदर जर हे काम झाले नाही तर स्टीलचे वाढते भाव वाढुन पुन्हा जनतेच्या दहा ते पंधरा कोटी रूपयांचा लॉस झाल्याशिवाय राहणार नाही. आत्ताच दहा ते पंधरा कोटी रूपयांचा लॉस झालेला आहे.

कार्यकारी अभियंता : स.सदस्यांनी जो मुद्दा मांडला ती वस्तुस्थिती आहे. प्रशासनातर्फे सांगण्यात आले की, सात दिवसांची गरज नाही हे काम २४ तासातही होऊ शकते. शेवटी ४८ तासांची मुदत दिली आणि सर्वांनी ४८ तासांत खुलासे केलेले आहे. क्रिसीलची तक्रार मा.सचिव श्री.मनुकूमार श्रीवास्तव, डिपार्टमेंट ऑफ इकोनॉमिकल अफेअर्स,एशियन डेव्हलपमेंट बँक यांना केलेली आहे. आमची एकटयाची यात भुमिका नाही क्रिसीलने तेवढयाच जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. क्रिसीलचे म्हणने आहे की, एवढया कमी कालावधीत हे काम होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांचे आणि आमचे मतभेद होत आहे. श्री.मनुकुमार श्रीवास्तव यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सदरचा टाईमटेबल तयार करण्यात आला होता.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :नागरपूर अधिवेशन चालू असतांना अधिकारी आणि पदाधिकारी मा.सचिव श्री.मनुकूमार श्रीवास्तव यांना भेटण्यास गेले होते त्या बैठकीत झालेली चर्चेचा खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता : सदरच्या वेळापत्रकामध्ये अल्पसा बदल होईल.

मा.सभापती : सदरचे वेळापत्रक कशासाठी ठेवण्यात आले होते.

कार्यकारी अभियंता :प्रशासनाचा प्रामाणिक प्रयत्न होता की वेळेच्या आत काम झाले पाहीजे. क्रिसील ऐकण्याच्या स्थितीत नाही त्यांचे म्हणने आहे की, एवढया कमी कालावधीमधे काम होऊ शकत नाही.

श्री.सतिष कटकटे :स्टीलच्या वाढणारे रेट बघता तो भुर्दंड जनतेला भरावा लागणार आहे हे सांगण्यात आले का?

कार्यकारी अभियंता :सांगण्यात आले आहे. मा.आयुक्तांनीही वेळोवेळी सुचना केलेल्या आहेत.

श्री.सतिष कटकटे :स्टीलचे भाव सतत वाढत आहे त्याचा भार जनतेला सहन करावा लागणार आहे.

कार्यकारी अभियंता :डिएसआरमुळे जो फरक येत आहे त्यातील १/२ निधी शासन देणार आहे. याचा अर्थ असा नाही की कामाला उशीर केला पाहीजे.

श्री.प्रशांत देसरडा :प्रशासनाने जो टाईमटेबल दिला आहे तो सर्व एजन्सींना दाखविण्यात आला आहे का?

कार्यकारी अभियंता :दाखविण्यात आला आहे.

श्री.प्रशांत देसरडा :हरकती आलेल्या आहेत काय?

कार्यकारी अभियंता :हरकती लेखी स्वरूपात देण्यात आलेल्या आहेत.

मा.सभापती :क्रिसीलला काम दिले नाही तर महानगरपालिकेला केंद्र शासन निधी देणार नाही.

श्री.प्रशांत देसरडा :क्रिसीलकडे पाहून निधी देण्यात आलेला नाही तर मराठवाडयाची राजधानी तसेच ऐतिहासिक शहर आहे येथील नागरीकांच्या समस्या पाहून निधी देण्यात आलेला आहे. नविन संकल्पना आहे, केंद्र शासनास हे मॉडल तयार करायचे आहे व ते देशभरात

राबवायचे आहे, निवीदेच्या कागदपत्रांची संख्या मोठी आहे मनपास अनुभव नाही त्यामुळे क्रिसीलला Accept केलेले आहे. दहा मुद्दयांपैकी कुठल्या मुद्दयावर एजन्सीने वेळ वाढुन मागीतला आहे त्याची मुदत कीती मागण्यात आलेली आहे खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता :इमेल द्वारे दोन ते तीन एजन्सींनी म्हणने मांडले आहे. RFP Document Financial Model & Concession Agreement, पात्र निविदाधारकांना RFP Document देणे दि.१५.१२.२००९, निविदापूर्व बैठक दि.२२.१२.२००९, उपस्थित मुद्यांचे स्पष्टीकरण दि.२८.१२.२००९ Financial Bid ची निविदा सादर करणे, उघडणे दि.३१.१२.२००९, यास त्यांचा विरोध आहे. त्यांना वारंवार बैठकीत सांगण्यात आले की, वेळ कमी आहे सिस्टीमचा अभ्यास सुरू करण्यात यावा म्हणुन लेखी कळविले आहे. प्रशासनाकडुल जेवढे प्रामाणिक प्रयत्न करायचे ते करण्यात आलेले आहे. RFP डॉक्युमेंट प्राप्त झालेले आहे ते वेल इन ॲडव्हान्समध्ये डिपार्टमेंट इन इकॉनॉमिकल अफेअर्स यांना देखील पाठविण्यास सांगीतले होते. क्रिसीलचे असे म्हणने होते की, डॉक्युमेंटला अगोदर मंजूरी द्या नंतर पुढच्या मंजूरीसाठी डिपार्टमेंट इन इकॉनॉमिकल अफेअर्स आणि एडीबी यांना पाठवू आमचे असे म्हणने होते की, सायमलटेनीस्ली झाले तर अजून वेळ वाचतो. प्रोजेक्ट पुर्ण करण्याचा प्रशासनाचा प्रामाणिक प्रयत्न चालू आहे. क्रिसील आणि प्रशासन यांचा कायम मतभेद होत आहे आणि झालेल्या मतभेदाची माहीती मा.सचिव श्री.मनुकूमार श्रीवास्तव यांना सांगण्यात येते.

श्री.सतिष कटकटे : क्रिसील एजन्सीस आतापर्यंत किती पेमेंट देण्यात आले.

कार्यकारी अभियंता : ४६ लाख रूपये देण्यात आलेले आहे. क्रिसीलचे काम चालू आहे निवीदा प्रक्रीया क्लीष्ट आहे.

श्री.सतिष कटकटे : वेळापत्रक जाहीर करायला नको होते.

कार्यकारी अभियंता : मा.सचिव यांचेशी झालेल्या चर्चेनुसार वेळापत्रक तयार केले होते.

श्री.प्रशांत देसरडा :एकुण अकरा पैकी दोन कंपण्यांनी वेळापत्रक चुकीचे आहे म्हणुन म्हटले आहे. म्हणजे नऊ लोकांची मेजोरीटी आहे. क्रिसीलने काही काम न करता ४६ लाख रूपयाचे बील दिले कसे. कुठल्या कामासाठी ४६ लाख रूपये बील देण्यात आले आहे याबाबतची टिप्पणी देण्यात यावी. ज्या हरकती सादर केलेल्या आहेत त्याच्या तारतम्यता तपासणुन आपल्या वेळापत्रकानुसार काम चालायला पाहीजे होते.

मा.सभापती :ज्या दोन हरकती आलेल्या आहेत त्याबाबत सभागृहास माहीती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता :विवोलिया आणि जिंदल या दोन कंपण्या आहेत.

मा.सभापती :कुणाच्या म्हणण्यावर हरकती दिलेल्या आहेत माहिती देण्यात यावी. पाईपाचे भाव वाढल्यामुळे २६ कोटीचे नुकसान झालेले आहे. या दोन कंपण्यांनी कुठल्या हरकती मांडल्या आहेत खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा :मॅप तयार आहेत मग टेंडर डॉक्युमेंटचे ४६ लाख रूपये कशाचे दिले. हि सर्व रिंग झ ाालेली आहे.

मा.सभापती :पाईपाचे जे रेट वाढलेले आहे त्यातील ५० टक्के रक्कम केंद्र शासन देणार आणि ५० टक्के रक्कम आपल्याकडील अब्जोरूपये पडलेले आहे त्यातुन देणार त्या बाबतीतचाही खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता :हा Procedural delay झालेला आहे.

मा.सभापती :या दहा दिवसांत २२ हजार परमॅट्रीक टन रेट वाढलेले आहे पाईपाचे जे रेट वाढलेले आहे त्यातील ५० टक्के रक्कम केंद्र शासन देणार आणि ५० टक्के रक्कम आपल्याकडील अब्जोरूपये पडलेले आहे त्यातुन देणार याबाबत प्रशासनाचे काय मत आहे.

कार्यकारी अभियंता :पीपीपी ऑपरेटरला वरचा जो फरक आहे महानगरपालिकेचा जो हिस्सा आहे तो पीपीपी ऑपरेटरला टाकायचा आहे.

मा.सभापती :पीपीपी ऑपरेटर पैसे कुणाकडून देणार आहे. जनतेकडून वसुल करून देणार की स्वतः देणार आहे.

कार्यकारी अभियंता :मुद्दाम delay करण्याचा हेतु नाही. हा Procedure delay झालेला आहे.

मा.सभापती :प्रथम योजना किती कोटीची होती.

कार्यकारी अभियंता :सन २००५-०६ साली ३६० कोटीची योजना होती आता ६२९ कोटीची योजना झाली.

श्रीमती सफिया मोमीन :समांतर जलवाहीनीचा विषय गंभीर आहे तो लवकरात लवकर सोडविला पाहीजे. योजनेस वेळ लागत असल्यामुळे योजनेवरील खर्च वाढत आहे. लवकरात लवकर जलवाहीनीचे काम सुरू केले जावे. योजनेस वेळ लागण्यास प्रशासन जबाबदार आहे.

कार्यकारी अभियंता :जिंदल आणि विवोलिया वॉटर इंडिया यांनी पत्र दिलेले आहे पत्रात नमुद केले आहे की, The urgency in completing the biding process well appreciated yet How can the completion corporation expect any of the bidders to do justice in biding for such a prectiges project after evaluating all complexities of the tender in time frame mention. Sir, we request you to give us adequate time to prepare techno commercially violable bidds for the tender. If its impossible to make the bid of seven hundred corers in seven days and three days time schedule mention unless we want to dilute the seriousness of the bidding process. We request extension of at lest six to eight week from the date of date from replace to bidders queryes and conference.

मा.सभापती :नऊ बिडर्स आलेले आहे. दोन कंपन्यांनी हरकती घेतलेल्या आहेत तर प्रोजेक्ट थांबु शकतो काय?

कार्यकारी अभियंता :आपल्या मताशी सहमती दर्शीविलेली आहे. केंद्र शासनाने क्रिसीलला नेमलेले आहे केंद्र शासनाच्या दृष्टीने हा पथदर्शक प्रकल्प आहे. केंद्र शासनाचे पुर्णपणे नियंत्रण आहे. प्रत्येक डॉक्युमेंट भारत सरकारकडे जात आहे त्यांचे ॲप्रुव्हल आल्यानंतर पुढची प्रोसेस होते.

मा.सभापती :दोन कंपण्या स्पर्धामध्ये राहील्या नाहीतर काय फरक पडतो.

कार्यकारी अभियंता :क्रिसीलने डॉक्युमेंट तयार करून दिल्यानंतर पुढची प्रोसेस होईल. क्रिसीलला काम लवकर करण्यासाठी भागपाडावे लागेल.

मा.सभापती :प्रशासनाने काम लवकर करून घेण्यासाठी काय केलेले आहे.

कार्यकारी अभियंता :क्रिसीलला वारंवार सुचना केलेल्या आहेत, केंद्र शासनाकडे अनेक तक्रारी केलेल्या आहेत परंतु क्रिसील मानत नाही. क्रिसीलचे म्हणने आहे की, एवढया कमी वेळात होऊ शकत नाही.

मा.सभापती :ई मेलच्या माध्यमातून ४८ तासात उत्तर द्या म्हणून कळविण्यांत आले. त्यांनी ते सात दिवसांच्या आत करा. मागील सहा महिण्यांपासून प्रशासनाची खात्री झालेली आहे काय की, क्रिसील प्रतिसाद देत नाही वेळ लावत आहे. मा.आयुक्तांचे प्रशासनाचे ऐकत नाही.

कार्यकारी अभियंता :डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिकल अफेअर्स यांनी क्रिसीलची नेमणुक केलेली आहे.

मा.सभापती :१४३ कोटी रूपये कोणत्या माध्यमातून मिळाले आणि आता ॲड केलेले १ कोटी २० लाख रूपये ते कुठे आहे खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता :१ कोटी २० लाख रूपये मिळालेले नाही त्यातील ४६ लाख रूपये मिळालेले आहे.

| | |
|---|---|
| मा.सभापती | :क्रिसीलला नेमल्यापासून महानगरपालिकेला काय फायदे झाले त्यासाठी ४६ लाख रूपये बिल अदा करण्यात आले. |
| कार्यकारी अभियंता | :सदरची प्रक्रिया ही खुप क्लिष्ट प्रक्रिया आहे. RFP डॉक्युमेंट तयार करून दिले व इतर डॉक्युमेंट तयार करून दिलेले आहे. पुर्ण शहराचा सर्वे करून प्रोजेक्ट रिपोर्ट तयार केला विवीध एजन्सी नेमलेल्या आहेत त्यांचे काम सुरू आहे. पीपीपी मॉडल अध्यक्षा श्रीमती अर्पणा भाटीया त्यांचेसमोर चर्चा झाली त्यानीही सांगीतले आहे की, योग्य काम केलेले आहे लेखी पत्राद्वारे मनपास कळविण्यांत आले की, त्यांनी काम केलेले असतांना पेमेंट का देत नाही त्याचे आधारे evaluation करून बिल अदा केलेले आहे. केंद्र शासनाने रक्कम मनपास दिली ती क्रिसीलला देण्यात आली. |
| मा.सभापती | :१० लाखाच्यावर कुठलेही पेमेंट मान्यता घेण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे असा नियम आहे का? |
| कार्यकारी अभियंता | :इस्टीमेटला मंजूरी आहे. केंद्र शासनाने आपल्या मार्फत रक्कम क्रिसीलला दिलेली आहे. |
| मा.सभापती | :महानगरपालिकेच्या नावाचा चेक दिला की, परस्पर केंद्र शासनाच्या नावाचा चेक दिला. |
| कार्यकारी अभियंता | :ट्रायपार्टी अॅग्रीमेंट आहे. आपल्या खात्यावर केंद्र शासनाने रक्कम जमा केली. १४३ कोटीची एजन्सी मनपा नेमणार आहे स्थायी समितीसमोर येईल. क्रिसीलची नेमणुक केंद्र शासनाने केलेली आहे. |
| श्री.सतिष कटकटे | :शासनाचा निधी आलेला आहे शहरात पाण्याची स्थिती गंभीर आहे. क्रिसील एजन्सी प्रशासनाचे केव्हा ऐकणार आहे. |
| कार्यकारी अभियंता | :याबाबतीत मा.आयुक्तांनीही अनेक वेळा चर्चा केलेली आहे,सुचना केलेल्या आहेत. |
| श्री.सतिष कटकटे | :दिवसेंदिवस भाव वाढ होत आहे. प्रकल्पावरील खर्च वाढत आहे. क्रिसीलमुळें वार्डात १५ दिवसांपासून पाणी नाही. |
| श्रीमती मेहरून्निसा खान | :दुसऱ्या एजन्सीला काम देण्यात यावे. |
| मा.सभापती | : दिनांक १६ तारखेला नागपुर येथे मा.सचिव श्री.मनुकुमार श्रीवास्तव यांचे सोबत झालेल्या चर्चेचा खुलासा करण्यात यावा. |
| मा.आयुक्त | : नागपूर येथे सचिवांसोबत झालेल्या बैठकीत मा.महापौर आणि क्रिसीलचे पदाधिकारी होते. स्किम तातडीने मार्गी लागावी तसेच प्रकल्पावरील खर्च वाढत आहे तिसरा मुद्दा म्हणजे केंद्र सरकार मार्फत मिळालेले १४३ कोटी आहेत याचा विनियोग लवकर व्हायला हवा. सन २०१० पर्यंत हि स्किम कार्यान्वित करायची आहे. राहीलेला कालावधी लक्षात घेता काम लवकर झाले नाही तर जो पुढचा दुसऱ्या टप्प्याचा हप्ता आहे तो मागता येणार नाही याचे कारण पुर्वीच्या रक्कमेचे युटीलायझेशन झाल्या शिवाय दुसरा हप्ता मिळणार नाही, म्हणुन प्रकल्प लवकर मार्गी लागावा क्रिसीलला सुचना करून तातडीने क्रिसीलने यामधे टाईमफ्रेम द्यावा व लवकरात लवकर काम करावे. हे जर समजा होत नसेल तर मग ज्या बाबींवर खर्च लवकर होऊ शकतो जसे पाईप लाईन अश्या एखाद्या पार्टवर खर्च करू शकतो का? महानगरपालिका पाईप घेऊन पीपीपी ऑपरेटरला नंतर देवुन दोन टेंडर काढुन म्हणजे दोन भाग करून एक भाग हा महापालिकेने पाईप हस्तगत करणे आणि ते पीपीपी ऑपरेटरला सांगुन पुढची योजना राबविणे अशा पध्दतीने करता येईल का? तसा विचार करावा तस पहाव क्रिसीलला तशा सूचना दिल्या होत्या की तस तुम्ही अभ्यासव अशी चर्चा झाली होती. क्रिसीलने सांगीतले होते की, मुंबईत जाउन लिगल अॅडव्हायझर यांचेशी बोलुन माहीती घेवुन हे शक्य आहे काय बघीतले जाईल. क्रिसीलचे अधिकारी ज्या दिवशी या ठिकाणी आले त्यावेळेस मी मुंबई येथे होतो माझी प्रत्यक्ष बोलणे झाले नाही. पुढची जी चर्चा झाली ते श्री.पानझडे सांगतील. |

कार्यकारी अभियंता :मा.आयुक्त,मा.महापौर,मा.सभापती व क्रिसीलचे अधिकारी यांचेशी बैठक घेण्यात आली होती. त्यावेळेस असे ठरले की, पाईप खरेदी न करता आपण त्याचेमधेच टाकू. हा प्रोजेक्ट इक्सपीडाईट करू आणि मग काम करू.

श्री.सतिष कटकटे :१६.१२.२००९ रोजी मा.आयुक्तांनी मा.श्री.मनुश्रीवास्तव यांचे बैठकीनंतर पुढची जी चर्चा झाली त्याबाबत माहीती देण्यात यावी.

मा.सभापती :सभागृहाची दिशाभुल करू नका, अनेक वेळा मा.आयुक्त आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे. मा.आयुक्तांनी दिलेल्या निर्देशांचे पालन झालेले नाही. १६ तारखेच्या बैठकीनंतर काय कारवाई झाली त्याचा खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता :३० तारखेला १६ तारखेच्या पाईपच्या टेंडरच्या अनुषंगाने कोणतीही चर्चा झालेली नाही. ३० तारखेला आरएफपी डॉक्युमेंटवर चर्चा होती.

श्री.प्रशांत देसरडा :दोन कंपण्यांचे टाईम पिरेड न पाळता ज्या नऊ कंपन्यांनी आपले काम स्विकारलेले आहे.

मा.सभापती :मागे आपल्याकडे टेंडरचे झाले आहे आपण टेंडर क्वालिफाई करत नाही, निवीदा उघडत नाही त्यांचे टेंडर उघडत नाही लिफाफा उघडत नाही. परंतु Mejority is power not right

श्री.प्रशांत देसरडा : दोन कंपणींनी आपल्याला विनंती केलेली आहे. क्रिसील कंपणीने कुठेही सांगीतलेले नाही की हे बंधनकारक आहे.

मा.सभापती :निवीदा स्विकारण्याचा काढण्याचा सर्व अधिकार मा.आयुक्तांना आहे. सर्व बदल करून क्रिसीलला अधिकार द्यावा लागेल.

श्री.प्रशांत देसरडा :वेळेच्या बाबतीत त्यांनी हरकती घेतलेल्या आहेत. त्याचे हरकती रद्द करायला पाहिजेत.

मा.सभापती :हरकतीच्या कुठल्या दिवशी आलेल्या आहेत दिनांक काय आहे.

कार्यकारी अभियंता :२३ डिसेंबर २००९.

श्री.प्रशांत देसरडा :दोन्ही कंपण्यांना सांगण्यात यावे की, तुमचे हरकती आमच्या टाईम पिरिएडमध्ये बसत नाही म्हणुन निकाली काढावे.

मा.सभापती :क्रिसीलच्या परवानगी शिवाय उत्तर देऊ शकत नाही.

श्री.प्रशांत देसरडा :टाईमपिरेड प्रमाणे प्रोसेस चालू करावी. जो काही भुर्दंड यामध्ये पडणार आहे मार्चच्या अगोदर ही स्किम केली नाही तर प्रत्येक दिवशी स्टिलचे बजेट वाढत आहे. मा.सचिवांनी सांगीतल्या प्रमाणे दोन भाग करून पाईप खरेदी करून काम सुरू करण्यात यावे.

मा.सभापती :दोन हरकती आलेल्या आहेत त्यावर प्रशासनाने कुठली कार्यवाही केलेली आहे.

कार्यकारी अभियंता :कार्यवाही केलेली नाही. प्रशासन प्रामाणिकपणे काम करीत असून वारंवार क्रिसीलला लवकरात लवकर काम करण्याच्या सूचना करीत असतो.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :क्रिसील काम करीत नसेलतर तयास पर्याय काय आहे.

कार्यकारी अभियंता :क्रिसीलचा टाईम टेबल आणि आपला टाईम टेबर यामध्ये चार महीण्यांचा फरक आहे. डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिकल अफेयर्स यांनीही कमी कालावधी असल्याबाबत सांगीतले आहे.

मा.सभापती :मा.आयुक्त शहरातील पाण्याच्या प्रश्नासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. त्यांचे म्हणण्यावरही कार्यवाही होत नाही. मा.सचिव श्री.मनुश्रीवास्तव यांचे १६.१२.२००९ रोजी आदेश दिले निर्देश दिले त्याचे पालन होत नाही. मा.आयुक्त सांगत आहे की, ३० तारखेला एजन्सी आली होती त्यावेळेस ते मुंबई इथे होते. प्रशासनासच्या म्हणण्याप्रमाणे चर्चाही झालेली नाही. दिनांक १६.१२.२००९ रोजी नागपुर येथे मा.सचिव श्री.मनुकूमार श्रीवास्तव यांनी निर्देश दिलेले आहे निर्देश देऊन आज २० दिवस झालेले आहे. त्यावर काय कार्यवाही झाली त्याचा खुलासा करण्यात यावा.

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता | :त्यामध्ये पाईप खरेदीचा जो प्रस्ताव होता, चर्चेमध्ये असे ठरले की, पाईप खरेदी करायचे नाही पीपीपी प्राजेक्टमध्येच हे काम करायचे असे मा.आयुक्तांसोबत चर्चा झ ाालेली होती. |
| मा.सभापती | :मा.आयुक्तांनी त्यावेळी निर्देश दिले होते की, ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणे काम झाले पाहीजे. |
| कार्यकारी अभियंता | :क्रिसील ही पीएमसी आहे, भारत सरकारने नेमलेली आहे. प्रशासनाचे प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे. |
| मा.सभापती | :४६ लाख रूपये बील अदा केले आहे ते कशासाठी खुलासा करण्यात यावा. |
| कार्यकारी अभियंता | :RFP डॉक्युमेंट तयार केलेले आहे. |
| मा.सभापती | :शहरातील नागरीकांना त्याचा काय फायदा झाला. |
| कार्यकारी अभियंता | :निवीदा प्रक्रियेमधील वेगवेगळया स्टेप पार करत आहोत. क्रिसीलचे इन्वायरमेंट वैज्ञ ाानिक,लिगल,फायनान्स, यांची टिम करून काम केले जात आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :मा.सचिव श्री.मनुकूमार श्रीवास्तव यांचेकडून याबाबतीत दोन दिवसांत स्पष्टीकरण करून पुढील बैठकीत याचे दोन भाग कसे करता येईल ते पहावे जेणे करून आपला वेळ वाचेल. |
| मा.सभापती | :मा.सचिव श्री.मनुकूमार श्रीवास्तव यांनी निर्देश दिलेले आहे तत्वतः मान्य केलेले आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :त्याबाबतीतचा कुठेतरी उल्लेख येणे गरजचे आहे. |
| मा.सभापती | :प्रशासनाने दिनांक १६ तारखेला नागपूर येथे झालेल्या बैठकीत कोणती चर्चा झाली याबाबत पुन्हा खुलासा करण्यात यावा व त्यामध्ये कुठले निर्देश देण्यात आले आहे. |
| मा.आयुक्त | :मिळालेले पैसे  तातडीने खर्च झाले पाहीजेत, मार्चच्या आत काही पैसे खर्च झाले तर दुसरा हप्ता मनपास मागता येईल. क्रिसीलच्या वेळापत्रकाप्रमाणे हे लवकर होईल असे दिसत नव्हते यासाठी काय करता येईल याबाबत चर्चा होती. चर्चा करत असतांना विषय मांडण्यात आले क्रिसीलच्या टेक्नीकल ॲडव्हाईसमध्ये ही एक पॉसीबिलीटी बघण्यास हरकत नाही जर दोन भागामध्ये करून ज्यावर आपल्याला जास्त खर्च करता येवु शकतो असा पाईपचा एक मोठा एटम आहे. याचा जर एक वेगळा पार्ट केला टेंडर वेगळे केले आणि सर्व साहीत्य पीपीपी ऑपरेटरला दिले त्याला तसे वेगळया टर्मस् कंडीशन्स करून करता येईल का? हे तपासण्यास हरकत नाही त्याप्रमाणे क्रिसीलने हे तपासावे. क्रिसीलने सांगीतले की, आमची लिगल टिम, इकॉनॉमिकल ॲडव्हायझर, इन्हायर्नमेंट यांना बसवुन हे तपासुन पहातो म्हणुन सांगण्यात आले. |
| श्री.प्रशांत देसरडा | :क्रिसीलच्या लिगल सेलने सांगीतले असेल की, तत्वतः दोन पार्ट करणे जमणांर नाही तर ठिक आहे. दोन पार्ट करणे चुकीचे आहे हे कुणी सांगीतले. |
| मा.सभापती | :कुणीच सांगीतले नाही. दिनांक १६ तारखेचे निर्देश पाळले असते तर मनपाचे,नागरीकांचे ३५ कोटी रूपये वाचले असते. ३० तारखेला क्रिसीलचे अधिकारी पाईप खरेदी करण्यासाठी आले होते की, RFP डॉक्युमेंटसाठी आले होते हे वादग्रस्त आहे याचा अद्यापपर्यंत खुलासा झालेला नाही. |
| श्री.सतिष कटकटे | :१६ तारखेला मा.सचिवांनी कुणाला सांगीतले. |
| मा.सभापती | :मा.आयुक्तांना सांगीतले. त्यावेळी मा.महापौरही उपस्थित होते. |
| श्री.सतिष कटकटे | :मा.आयुक्तांनी संबधीत अधिकाऱ्यांना सांगीतले का? |
| मा.सभापती | :कळविण्यांत आले तसेच क्रिसीललाही सांगण्यात आले. परंतु क्रिसील कोणतीच गोष्ट ऐकत नाही. हे सिध्द झालेले आहे. |
| कार्यकारी अभियंता | :पाईपाची खरेदीची चर्चा झाली होती डायरेक्ट खरेदी करायचे की, पीपीपी मॉडल मधून त्या एजन्सीने काम करायचे. |

मा.सभापती :याबाबतीत दिनांक २१.१२.२००९ रोजी सर्वसाधारण सभेने काही आदेश केलेले आहे. निर्देश दिलेले आहे याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना दिलेले आहे. त्याबाबतीत काय झाले आहे. या प्रोजेक्टसाठी मा.आयुक्तांकडुन कुठल्या अधिकाराचा वापर करून घेतला आहे या प्रोजेक्टसाठी. सदरचा प्रोजेक्ट ३०० कोटीचा ७०० कोटींचा झाला. मा.सचिव श्री.मनुकूमार श्रीवास्तव यांनी दिलेल्या गेल्या २० दिवसांपासून पालन झ ाालेले नाही.

कार्यकारी अभियंता :अंतिमतः पाईप खरेदीचा विषय ठेवला नव्हता. मा.सचिवांनी पाईप खरेदीची शक्यता तपासुण पहावे असे सांगीतले होते.

श्री.विनायक पांडे :गेल्या एक तासापासून समांतर जलवाहीनीबाबत चर्चा चालू आहे. सदरील विषय हा गंभीर आहे. मा.सचिवांनी पाईप खरेदीची शक्यता पडताळून पहाण्याचे सांगीतले होते. जेवढया कंपण्या येत आहे त्यांचे स्वतःची पाईपाचे प्रोजेक्ट आहे. शेवटी अंतिम निर्णयाकडे जावे. कितीही खुलासे घेतलेतरी प्रशासन यापैक्षा स्पष्ट खुलासा करू शकणार नाही मा.आयुक्त करू शकणार नाही.

मा.सभापती :औरंगाबाद महापालिकेचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प नागरिकांच्या जिव्हाळयाचा आहे. सदर प्रकल्प ppp मॉडलद्वारे सुरू करणे आहे. त्यासाठीची निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. मात्र ही प्रक्रीया पूर्ण करत असतांना कालावधी जास्त लागत आहे. त्यासाठी Crisil Infrastructure Advisory हे फारच धिम्या गतीने प्रकल्पाची निविदा प्रक्रीया हाताळत आहे. महानगरपालिकेने वारंवार पाठपुरावा करून देखील या निविदा प्रक्रीयेची गती वाढलेली दिसून येत नाही. या प्रकल्पाची किंमत जी पूर्वी रूपये ३६० कोटी होती ती आज रूपये ६२९ कोटी रूपयांवर जाऊन पोचली आहे आणि असाच विलंब लागत गेला तर या प्रकल्पाची किंमत आणखी वाढेल. या प्रकल्पात सुमारे ८० ते ८५ टकके रक्कम ही पाईप लाईनची आहे. दिवसेंदिवस पाईपांच्या किंमती, लोखंड/स्टीलच्या किंमती मोठया प्रमाणात वाढत आहेत. त्यामुळे प्रकल्पाच्या उशिरा सुरू होण्यामुळे साहजिकच प्रकल्पाची किंमत वाढून त्याचा आर्थिक बोजा महापालिकेवर पडत आहे, पर्यायाने येथील जनतेवर पडणार आहे. त्यामुळे ही स्थायी समिती सभा असे आदेशित करत आहे की, या योजनेसाठी लागणाऱ्या पाईपांची खरेदीनंतर हे पाईप डिपार्टमेंटली ppp ऑपरेटर (कंत्राटदार) यांना पुरवावेत व काम पूर्ण करून घ्यावे. त्यासाठी दिनांक १६.१२.२००९ रोजी नागपूर येथे मा.सचिव, नगर विकास यांचे समवेत झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार,मा.सचिव यांनी अशा प्रकारे प्रथम पाईप खरेदीचे वेगळे टेंडर काढण्यास तत्वतः सहमती दर्शविली होती. त्यामुळे आता त्यांची लेखी अनुमती मिळेल या अपेक्षेवर निविदेची कार्यवाही लगेचच सुरू करून पाईपांच्या पुरवठादारास फेब्रुवारी मध्यापर्यंत कार्यादेश देण्यात यावेत. मा.आयुक्त यांना या संदर्भांत सर्व अधिकार देत आहे. या शहराच्या हिताच्या दृष्टीने स.सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे या शहराच्या हितासाठी या शहराच्या जनतेसाठी वारंवार पाण्याचा प्रश्न आहे. अनऑफिशिअली १५ दिवस पाणी देत आहे आणि ऑफिशअली १० दिवस पाणी देत आहे. याचाही गांभियाने विचार करून या योजनेसाठी पुढील कार्यवाही मा.आयुक्त यांनी करावी. सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येत आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शहरात नागरीकांनी भावना आहे की, गरीबांचे अतिक्रमण काढले जाते व श्रीमंताचे अतिक्रमण काढले जात नाही. अतिक्रमण मोहीम ही गरीबांसाठीच राबविली जाते श्रीमंताचे मोठमोठे बंगले,मालमत्ता यांचे अतिक्रमण काढले जात नाही. माझी प्रशासनास विनंती आहे की, एक महीणाभर जेवढया मोठमोठया लोकांनी अतिक्रमण केले असेल तीथे आठ दिवसांच्या आत माहीम राबविण्यात यावी.

मा.सभापती :अशी मोहीम सुरू आहे का? बंद आहे खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त(सिडको) :प्रशासकीय विभागाअंतर्गत मोहीम चालू आहे. श्रीमंत आणि गरीब असा भेदभाव नाही. जे बेकायदेशीर बांधकाम आहे त्यांचेविरूध्द मोहीम राबविली जात आहे.

श्री.प्रशांत देसरडा :वर्तमानपत्रात आलेल्या जाहीरातीनुसार पेट्रोल पंप साठी काही लोकांना महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र लागत असेल त्याच्याशिवाय ते एजन्सीच्या फॉरमॅटमध्ये येऊ शकत नाही. बऱ्याचशा लोकांनी ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केलेले आहे परंतु नाहरकत प्रमाणपत्र दिले जात नाही यामध्ये खुली स्पर्धा व्हावी अशी आमची इच्छा आहे. ज्याज्या लोकांनी ना हरकतीसाठी अर्ज केले असतील त्यांना नियमाने देउ शकतो अशा लोकांना ना हरकत प्रमाणपत्र लवकरात लवकर देण्यात यावे. टाऊन हॉल परिसरातील जनतेला सुविधा होतील. आज जे काही टेंडर रिकॉल केले त्याच्यात ज्या काही अटी ठेवल्या आहेत त्याच रेटमध्ये या निविदा निघाल्या पाहीजेत.

मा.सभापती : तीन दिवसांत त्या निविदा निघणार आहे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी त्यासंबधी खुलासा करावा.

श्री.प्रशांत देसरडा :मागील बैठकीत रूलिंग दिली होती की, तीन दिवसांत रिकॉल करण्यात यावा म्हणुन परंतु अजूनही निविदा आलेल्या नाही.

श्रीमती सफिया मोमीन :वार्ड नंबर ९६ मध्ये शाहशोक्ता कॉलनी येथील शाळेचे भाडे ठरलेले नाही.

श्री.सतिष कटकटे :पैठणगेट येथील शाळेचे लाईट बिल प्रशासन भरत नाही, शिक्षक स्वतःच्या पगारातुन महिण्याचे लाईट बिल अदा करत आहे.

श्री.प्रशांत देसरडा : आपण कुठलीच जागा भाडयाने घेतलेली नाही. पाच वर्षापुर्वी स्थायी समितीचा सदस्य असतांना त्या ठिकाणी एक इमारत बांधलेली आहे. महानगरपालिकेने स्वतःच्या जागेवर ३० लाख रूपये खर्च करून इमारत बांधलेली आहे. पैठणगेटच्या सादिया टॉकीजच्या समोर ३० ते ३२ लाख रूपये खर्च करून इमारतीचे बांधकाम केलेले आहे. त्यावेळी लवकरात लवकर निवीदा काढुन कामाचे उद्घाटन केलेले आहे. स.सदस्य श्री.सतिष कटकटे यांचे म्हणण्याप्रमाणे भाडयाने चालवतो.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

शिक्षणाधिकारी :पैठणगेट येथील इमारतीमध्ये सदरच्या मालकाने आठ खोल्या खाजगी शाळेला भाडयाने दिलेल्या आहे व आठ खोल्या मनपाला दिलेल्या आहेत.

श्री.सतिष कटकटे :सदरील शाळेत एकुण ८५६ विद्यार्थी आहेत. खालील आठ खोल्यांमध्ये मनपाची शाळा चालते तर वर खाजगी शाळा चालते. लाईटबिल आपले मनपाचे शिक्षक भरतात.

मा.सभापती :जागा कुणाच्या मालकीची आहे.

शिक्षणाधिकारी :जागा ही खाजगी आहे. आठ खोल्या खाजगी शाळेला भाडयाने दिलेल्या आहे व आठ खोल्या मनपाला दिलेल्या आहेत.

श्री.सतिष कटकटे :शाळेचे लाईटबिल कोण भरते.

शिक्षणाधिकारी :शाळेचे लाईटबिल आत्तापर्यंत महानगरपालिकेतील शिक्षक जमा करून भरतात.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :मनपाच्या मालमत्तांचे लाईटबिल भरण्याची जबाबदारी कुणाची आहे.

श्री.प्रशांत देसरडा :सदरील शिक्षकांचे अभिनंदन करायला पाहीजे. खालच्या शाळेत खिचडी तयार होते आणि तीच खिचडी वरच्या शाळेत पुरविली जाते.

श्री.सतिष कटकटे :सदरील शाळेचे लाईटबिल महानगरपालिकेने भरावे.

श्री.प्रशांत देसरडा :उद्घाटन झालेली इमारती बाबत खुलासा करण्यात यावा. स.सदस्य श्री.सतिष कटकटे यांचे म्हणण्याप्रमाणे भाडयाने आहे आणि माझ्या माहीती प्रमाणे ती मनपाची आहे.

मा.सभापती :दोन इमारती वेगवेगळया आहेत का?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सब्जीमंडी येथे दोन शाळा चालतात एकाच इमारतीमध्ये.

मा.सभापती :स.सदस्य श्री.प्रशांत देसरडा यांचे म्हणण्याप्रमाणे त्याभागात एक इमारत बांधली होती सदरील इमारत चोरीला गेली असेलतर प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.सतिष कटकटे :सर्वात जास्त विद्यार्थी संख्या त्या शाळेत आहेत.

मा.सभापती :प्रशासनाने सात दिवसांत सदरील प्रकरणाची सखोल चौकशी करून पुढील स्थायी समितीमध्ये माहीती सादर करावी.

श्री.प्रशांत देसरडा :शाळा (इमारत) बांधली की नाही हे सांगण्यात यावे.

श्री.सतिष कटकटे :चौकशी करण्याची आवश्यकता नाही कित्येक वर्षापासून त्या ठिकाणी आम्ही राहत आहे.

उपअभियंता(इ व उ.बां.) :पैठणगेट सादीया मार्केटसमोर एक जुणे सुलभ सौचालय होते ते शासनाच्या निधीतून बांधण्यात आले होते. त्या वेळचे स.स.श्री.अशफाक सलामी यांनी एक ठराव मांडून तिथे सुलभ सौचालय पाडून त्या ठिकाणी महानगरपालिकेचे एक नविन शाळेची इमारत व्हावी म्हणून ठराव पारीत केला होता जी प्लस वन अशा स्ट्रक्चरचे २३ लाखाचे अंदाजपत्रक तयार केले होते आणि त्यानुषंगाने जुणे सौचालय तोडुन तिथे शाळेचे इमारतीचे उद्‌घाटन झाले होते आणि काही प्रमाणात काम सुरू झाले होते. काम सुरू झाल्यानंतर मध्यंतरी काही लोकांनी कळविले होते की, ती शाळा अंशत: एक कॉर्नर (१७ ते १८ स्के.मिटरचे पोर्टशन) डिपी रोडमध्ये बाधीत होत आहे. त्यामुळे ते काम त्या स्टेजमध्ये थांबविण्यात आलेले आहे आणि अडीच लाख रूपये खर्च झालेला आहे. सर्वसाधारण सभेत यानंतर प्रस्ताव गेला मायनर मॉडीफिकेशन करण्यात आलेले आहे. त्याभागाचा रोड डायव्हर्ट करून त्या शाळेला रहिवासी क्षेत्रात समावेश करून ती शाळा पुन्हा बांधण्यात यावी असा ठराव झालेला आहे. शासनाकडे टाउन प्लॅनिंग मार्फत पाठपुरावा सुरू आहे.

श्री.सतिष कटकटे :इमारत बांधुन किती वर्ष झालेले आहे.

उपअभियंता(इ व उ.बां.) :किमान पाच वर्ष झालेले आहे.

श्री.सतिष कटकटे :रोड डायव्हर्ड केला, सर्वसाधारण सभेने मान्यता दिली शासनाला कळवुन शासनाची मंजूरी आलेली आहे का.

श्री.प्रशांत देसरडा :मायनर चेंजेसचे अधिकार मा.आयुक्त यांना आहेत मग शासनास पाठविण्याची गरज काय?

उपअभियंता(इ व उ.बां.) :त्यावेळेस हे सर्व प्रकरण टाउन प्लॅनिंग विभागाने हाताळले हाते.

श्री.प्रशांत देसरडा :संबधीत अधिकारी यांचे अभिनंदन करण्यात येते त्यांनी ही सर्व माहीती उपलब्ध करून दिली खुलासा केला. मी ज्यावेळेस स्थायी समितीचा सदस्य होतो त्यावेळेस सदरील कामाच्या उद्‌घाटनास गेलो होते. त्या भागात काही दिवस राहत होते त्यामुळे त्या ठिकाणी शाळा व्हावी म्हणुन माझी इच्छा होती. आज सात वर्ष झालेले आहे इमारतीचे दोन मजले पुर्ण झालेले आहेत. जिथे आज मनपा भाडयाने शाळा चालवते त्यास लाखो रूपये भाडे दिले. अस कित्येक जागी आहे शाळा जिथे आज आपण आपल्या मालकीच्या जागी चालवु शकतो पण ते भाडेकरू ज्यांच्या प्रॉपटर्या आहेत ते शाळा होऊ देत नाही कारण त्यांचे मिटर चालू आहे.

श्री.सतिष कटकटे :ज्यांनी त्या ठिकाणी अतिक्रमण केले असेल त्यांना त्या ठिकाणातुन काढण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा :त्याठिकाणच्या लोकांना तिथुन तात्काळ काढण्यांत यावे व शाळा तिथे शिफ्ट करण्यात यावी आणि आज रोजी पर्यंत का झाली नाही याबाबतची चौकशी करण्यात यावी. मनपाच्या शिक्षकांचे स्थायी समितीमार्फत अभिनंदन करण्यात यावे की ज्यांनी आपल्या स्वत:च्या पगारातुन शाळेचे लाईटबिल अदा केलेले आहे. लाईट बिल महानगरपालिकेने भरले पाहीजे.

मा.सभापती :जर ती जमीन महानगरपालिकेच्या मालकीची असेल तर ती ताबडतोब ताब्यात घेण्यात यावी.

मा.आयुक्त :मालमत्ता अधिकारी, श्री.जावळीकर, प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदरील प्रकरणाची सविस्तर चौकशी करावी. ज्यांचे कुणाचे अतिक्रमण असेल ते अतिक्रमण ताबडतोब निष्काशित करावे. लाईटबिल संदर्भात ती इमारत कुणाची शाळा कुणी घेतली याबाबतचा सर्व तपासकरून अहवाल देण्यात यावा. वरच्या मजल्याचे बिल कशामुळे भरले जाते आणि शिक्षक बिल का भरतात मनपाची प्रोव्हीजन का नाही याची सर्व तपासणी करण्यात यावी.

मा.सभापती :पुढील महिण्यापासून शाळेचे लाईट बिल मनपाने भरावे.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद